प्रसूती रजेच्या विद्यमान तरतुदींमध्ये सुधारणा आणि मूल दत्तक घेणा-या महिला शासकीय कर्मचा-यांना देय व अनुज्ञेय रजा मंजूर करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:अरजा 1490/12/सेवा-9,
मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक:- 28 जुलै, 1995.

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 च्या नियम 74 मध्ये विहित केलेल्या शर्तीच्या अधीन राहून महिला शासकीय कर्मचा-यास प्रसूती रजा मंजूर करण्यात येते. कुटुंब लहान व मर्यादित ठेवण्याच्या उपाययोजनेसाठी केंद्र शासनाने केंद्रिय नागरी सेवा (रजा) नियम, 1972 मधील प्रसूती रजेच्या विद्यमान तरतुदींमध्ये सुधारणा केलेल्या आहेत. लोकसंख्या नियंत्रण व कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविण्याचे राज्य शासनाचेही धोरण असल्याने केंद्र शासनाकडील प्रसूती रजेच्या सुधारित तरतुदी स्वीकारण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. यासंबंधात शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

(अ) प्रसूती रजेचा अर्ज केल्याच्या तारखेस दोन किंवा दोन पेक्षा कमी हयात मुले असलेल्या कायम सेवेतील, कायम सेवेत नसलेल्या व कमीत कमी 1 वर्ष संतत सेवेत असलेल्या त्याचप्रमाणे 33 महिन्यांची संतत सेवा केलेल्या कार्यव्ययी आस्थापनेवरील किंवा उक्त्या दराने अथवा रोजंदारीवर पारिश्रमिक देण्यात येणा-या महिला शासकीय कर्मचा-यांना सक्षम प्राधिकारी रजा सुरु झाल्याच्या तारखेपासून 90 दिवसांच्या कालावधीइतकी प्रसूती रजा मंजूर करु शकेल.

(ब) महिला शासकीय कर्मचा-याने मागणी केल्यास प्रसूती रजेला जोडून वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता कमाल एक वर्षाच्या कालावधीपर्यंत (60 दिवसापर्यंत परिवर्तित रजा व अनर्जित रजा धरुन) देय व अनुज्ञेय रजा घेण्यास परवानगी देता येईल.

(क) गर्भपात, गर्भस्त्राव आणि गर्भसमापन अधिनियम, 1971 अन्वये घडवून आणलेला गर्भपात, यांच्याबाबतीत महिला शासकीय कर्मचा-याला तिच्या संपूर्ण सेवेच्या कालावधीमध्ये (किती मुले हयात आहेत हे विचारांत न घेता) कमाल 45 दिवस इतकी प्रसूती रजा अनुज्ञेय राहील.

(ड) गर्भपात इ. कारणास्तव महिला शासकीय कर्मचा-यास विश्रांतीसाठी जास्त कालावधीची आवश्यकता असेल तर देय व अनुज्ञेय रजा मंजूर करुन अनुपस्थितीचा कालावधी नियमित करता येईल.

(इ) हे आदेश अंमलात आल्यानंतर गर्भपात इ. कारणास्तव प्रसूती रजा मंजूर करताना पूर्वी उपभोगण्यात आलेली अशा प्रकारची प्रसूती रजा विचारात घेण्यात येऊ नये.

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 मधील नियम 74 च्या इतर तरतुदी पूर्वीप्रमाणेच राहतील.

2 केंद्र शासनाने अलीकडेच, लहान मूल दत्तक घेणा-या मातेला नैसर्गिक मातेप्रमाणेच दत्तक मुलाचे संगोपन करावे लागते आणि सुरुवातीच्या काही कालावधीत दत्तक मुलाला नवीन वातावरणाची सवय व्हावी म्हणून मुलाच्या सोबतही रहावे लागते, या बाबी विचारात घेऊन लहान मूल दत्तक घेणा-या केंद्र शासकीय महिला कर्मचा-यांना एक वर्षाच्या मर्यादेपर्यन्त देय व अनुज्ञेय रजा मंजूर करण्यासंबंधात आदेश निर्गमित केले आहेत. सदरहू आदेश राज्य शासकीय महिला कर्मचा-यांना लागू करण्याचा प्रश्न देखील शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, मूल दत्तक घेतलेल्या महिला शासकीय कर्मचा-याला एक वर्षापर्यन्त किंवा मुलाचे वय एक वर्ष पूर्ण होईल तो दिनांक यापैकी जो अगोदरचा दिनांक असेल त्या दिनांकापर्यन्त देय व अनुज्ञेय रजा (वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता 60 दिवसापर्यन्त परिवर्तित रजा व अनर्जित रजा धरुन) घेण्यास परवानगी देता येईल. मूल दत्तक घेण्याच्या दिनांकाला दोन मुले हयात असलेल्या महिला कर्मचा-याला मात्र ही सवलत अनुज्ञेय राहणार नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय

कृ.मा.प.

मु./रेट/अ-589(1?,000+10-7-95)

3. वरील आदेश राज्य पुनर्रचना अधिनियम, 1956 व मुंबई राज्य पुनर्रचना अधिनियम, 1960 मधील तरतुदी वाटप प्राप्त महिला कर्मचा–यांनाही लागू राहतील. अशा महिला कर्मचा–याला यासंबंधातील विद्यमान तरतुदी स्वीकारण्याबाबत विकल्प देता येईल.

4. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

5. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 मधील यासंबंधातील विद्यमान तरतुदी या शासन निर्णयातील तरतुदींपरत्वे सुधारण्यात आल्या असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमांमध्ये रीतसर सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शरद बसनाक
शासनाचे अवर सचिव

प्रति,

महालेखापाल–1, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई (80 प्रती)
महालेखापाल–2 (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर (80 प्रती)
महालेखापाल–1 (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई (40 प्रती)
महालेखापाल–2 (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर (40 प्रती)
महालेखापाल (वाणिज्य लेखापरीक्षा), मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (40 प्रती)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (5 प्रती)
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई
* प्रबंधक, अपील शाखा, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
मुख्य लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
मुख्य मंत्र्यांचे सचिव
मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
राज्यपालांचे सचिव
विभागीय आयुक्त, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती
सर्व मंत्रालयीन विभाग
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधिकाराखाली असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली
वित्त विभागातील सर्व कार्यासने, (ग्रंथपाल 5 प्रती)
निवड नस्ती – कार्यासन सेवा–9, वित्त विभाग.

------

* पत्राने.

क्र/आस्थापना/ब-पीकि.वी.309/९२
जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी दि 30/९/९२

प्रत:- तहसिलदार (सर्व)
प्रत:- उपविभागीय अधिकारी (सर्व)
प्रत:- विशेष भू संपादन अधिकारी (सर्व)